गुरुवार, दि. ६ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २१५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्याचा बिहार झाला - गोरंट्याल

### आरोपींना मोका लावण्याची मागणी; जुन्या वादाच्या कारणावरून दोघांना मारहाण

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील अहंकार देऊळगाव येथील दोघा सख्ख्या भावंडांना जुन्या वादाच्या कारणावरून बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना तीन मार्च रोजी घडली होती. यातील गंभीर जखमी दोघे भाऊ एका खाजगी दवाखान्यात उपचार सुरु आहे. बुधवार (दि ५) रोजी माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी जखमींची व त्यांच्या परिवाराची भेट घेतली. प्रकरण जाणून घेतले. जालन्याचा बिहार झाला असल्याची प्रतिक्रिया माजी आ. गोरंट्याल यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.



जालना तालुक्यातील अहंकार देऊळगाव येथील अर्जुन मच्छिंद्र सोमधने यास तीन मार्च रोजी सकाळच्या दरम्यान चार ते पाच जणांनी मारहाण केली. मागील महिन्यातच कृष्णा सोमधने यासही मारहाण झाली होती. त्याच्यावरही एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही मारहाण माजी सरपंच बाबासाहेब सदाशिव सोमधने यांच्यासह चार जणांनी केल्याचा आरोप मच्छिंद्र सोमधने यांनी केला आहे. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध १०९ भारतीय न्याय संहिताप्रमाणे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी दोन संशयीतांना ताब्यात घेतले आहे. मोकिंदा खरात, परमेश्वर गंडाळ या दोघांना पोलीसांनी ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरु असल्याचे पोलीसांकडून सांगण्यात आले आहे. मुख्य आरोपी बाबासाहेब सोमधने यांच्या विरुद्ध आतापर्यंत ८ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस सुत्रांकडून मिळाली आहे.

दरम्यान माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी जखमींना भेटून त्यांच्या प्रकृतीची आस्तवाईकपणे विचारपुस केली. या मारहाणीवरून माजी आ. गोरंट्याल यांनी पोलीसांवर निशाणा साधला असून आरोपींवर मोका लावण्याची मागणी केली. गेल्या काही दिवसांपासून शहरामध्ये गुन्हेगारी वाढली आहे. गुन्हेगारांवर पोलीसांचा वचक राहीला नाही. बिहार झाला असल्याचा गंभीर आरोप करत जालन्याच्या पोलीस दलावर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंकुश लावावा असेही माजी आ. गोरंट्याल म्हणाले.

## महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात द्या - भदन्त शिवली शाक्यपुत्र

### हक्कासाठी क्रांती मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन




**जालना । प्रतिनिधी -** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे जगभरातील बौद्धांचे प्रमुख तीर्थक्षेत्र असून या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन हे बौद्धांच्या ताब्यात नाही. ते बौद्धांच्याच ताब्यात असावे, यासाठी जालना जिल्ह्यातील आंबेडकरी अनुयायांच्या वतीने दि. ११ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर क्रांती मोर्चा धडकणार आहे. या क्रांती मोर्चात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पू. भदन्त शिवली शाक्यपुत्र यांनी केले आहे.

बुधवार दि. ५ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ वाजता जालना येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भन्ते संबुद्ध, सुदामराव सदाशिवे, राजेश ओ. राऊत, आण्णासाहेब चित्तेकर, संजय हेरकर, संजय भालेराव, महेंद्र रत्नपारखे, छायाताई हिवाळे, सत्यशिला राऊत यांची उपस्थिती होती.

देशभरातून बौध्द समाजाच्या वतीने या विहारासाठी लढा उभारला जात आहे. विविध बौद्ध संघटनांकडून आंदोलन केले असून केंद्र सरकारला निवेदन पाठवण्यात आले आहेत. त्यामुळे जालना येथील जिल्हाधिकार्यांमार्फत बुद्धगया महाबोधी महाविहार हिंदू पंडितांच्या तावडीतून मुक्त करून बौद्धांच्या हातात द्या, अशी मागणी करण्यात येणार आहे.

इ.स.पूर्व तिसर्या शतकात सम्राट अशोकाने महाबोधी महाविहार चे बांधकाम केले. शांतीचे अग्रदूत गौतम बुद्ध यांना ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली, तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. बौद्ध अनुयायी भिक्खू आणि जगभरातील पर्यटक तसेच शांतीचा मार्ग स्विकारणारे बांधव येथे येतात. मात्र, या महाविहाराचे नियंत्रण व व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी चे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई हे १९९२ पासून आंदोलन करीत आहे. सध्या महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेण्यासाठी सामाजिक पान ३ वर

युवा आदर्श

## समिती ...

महत्वपूर्ण असे ती
सल्लागार समिती
जाणकार निवडावे
नको खोगिर भरती
काटेकोर सर्वकाही
आखायची भूमिती
लेखा जोखा जाणा
कसेघडे आजमिती
दूरदर्शी सभासद ते
समितीतले गणिती
समस्ये मागे कारण
करती योग्य गणती
मोजमाप यथायोग्य
अनुभवसिद्धप्रमिती
निराकारण रे शंकेचे
तर्क सिध्द अनुमिती
निकष लावून कडक
मगचं द्यावी अनुमती
क्रिया प्रक्रिया सगळी
उचीत करी परिमिती
निर्णय कारवाई भली
हवी सकल सहमती
विचार समन्वय होई
देतीलं त्वरित संमती
दिशा दर्शन कराया
उजळे उर्जा पणती
मसुदे बनवावे चोख
कलमे हवी कोणती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## रमजान निमित्ताने कर्मचाऱ्यांचे वेतन ईदपुर्वी खात्यात जमा करा

### हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन ची मागणी!

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** सद्या मुस्लिम धर्मातील पवित्र रमजान महिना सुरु असून एप्रिल महिन्यात अंदाजे चंद्रदर्शन प्रमाणे ३० मार्च २०२५ किंवा ३१ मार्च २०२५ रोजी मुस्लिम समाजातील मोठा सण रमजान ईद हा राष्ट्रीय सण साजरा होकार आहे. देशात मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहाने ईद सण साजरा करत असतात यानिमित्त वेतन लवकर करण्यात यावे. मार्च अखेर कामांचे (थैीज्ञश्रेरव) कारण न देता वेतन यावेळी ३० मार्च किंवा ३१ मार्च ला रमजान ईद असल्याने वेतन प्रक्रिया गतिमान करून मार्च महिन्यातच म्हणजे २० ते २२ मार्च पर्यंत तारखेच्या आत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात माहे मार्च महिन्याचे वेतन जमा करण्याची मागणी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी राज्याचे शालेय शिक्षण विभागाचे मा. प्रधान सचिव साहेब, मा. शालेय शिक्षण आयुक्त साहेब, शिक्षण संचालक प्राथमिक व माध्यमिक साहेब यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. तरी रमजान ईद या सणाचे पान ३ वर




## महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील निष्क्रिय खाते सक्रिय करून घ्या - राहुल पवार

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील रामनगर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अंतर्गत बँक खातेदार ज्यांनी बऱ्याच कालावधीपासून खात्यात व्यवहार न केल्यामुळे त्यांचे खाते निष्क्रिय झालेले आहे. त्यासाठी त्या खातेदारांनी आधार कार्ड पॅन कार्ड ,फोटो घेऊन बँकेतून घधउ करून घेणे आवश्यक आहे. जालना तालुक्यातील रामनगर येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा अंतर्गत १३ गावे येत असून २८ हजार खातेदार त्यापैकी व्यवहार न केल्यामुळे तीनशे खातेदारांचे खाते हे निष्क्रिय झाले आहेत आहेत अशा खातेदारांनी निष्क्रिय खाते सक्रिय करण्यासाठी के वाय सी करून घ्यावी व ज्या खातेदारांनी बऱ्याच महिन्यापासून खात्यात व्यवहार केला नाही त्यांनी त्याचे निष्क्रिय खाते सक्रिय करून घ्यावे असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा रामनगर शाखा व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांनी केले.



## संघ कोच म्हणून रुपेंद्र पारचा यांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** नारायणा ई - टेक्नो शाळेचे कराटे प्रशिक्षक सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांची मेरठ उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या ऑल इंडिया (राष्ट्रीय) इंटर युनिव्हर्सिटी किक बॉक्सिंग ( पुरुष/महिला) २०२४-२५ स्पर्धेसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ संघाचे संघकोच म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे नारायणा शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, डीन वेंकट राजू गुंडला, माजी गरसेवक महावीर ढक्का, राजेश राऊत, संजय भगत, प्रो. यादव, प्रमोद खरात, सुभाष पारे, उमेश खंदारकर, प्रशांत पेम्बर्ती, गणेश श्रीराम, सचिन खर्डेकर, महेश सावजी व पालक वर्ग यांनी सत्कार करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## युवक- युवतींसाठी निवासी प्रशिक्षणाचे आयोजन

**जालना -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नव उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना कार्यान्वित आहे. वर्ष २०२४- २५ साठी निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मराठवाडा विभागामध्ये ३२० नवउद्योजकांना निवासी उद्योजकता पान ३ वर

## विधी शिक्षण प्रवेश परीक्षेसाठी १७ मार्चपर्यंत नोंदणी करता येणार

**जालना । प्रतिनिधी -** बारावी नंतर तसेच पदवीधर विद्यार्थ्यांसाठी विधी शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेच्या नाव नोंदणीसाठी महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने १७ मार्चपर्यंत मुदतवाढ दिल्याने या संधीचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन ॲड. महेश धन्नावत यांनी केले आहे.



ॲड. धन्नावत यांनी म्हटले आहे की, विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या अंतिम मुदतीत तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. पूर्वी २७ जानेवारी, त्यानंतर २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ पान ३ वर

### स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणी एक दिवस आत्मक्लेश अन्नत्याग आंदोलन

## अक्षम्य असंवेदनशील महाराष्ट्र सरकार बरखास्त करा

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर उपविभागीय कार्यालयाचे मा. उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मा.सी.पी. राधाकृष्णन साहेब. राज्यपाल महाराष्ट्र राज्य मुंबई यांना निवेदन सादर करण्यात येते की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अमानुष क्रूर हत्या होऊन आडिच महिने झाले. या अडीच महिन्यात मंत्री मुंडे यांना सरकारने वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. जसे हत्येतील आरोपी दोषी आहेत तसेच यात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे ही दोशी आहेत. संतोष देशमुख यांच्या हत्ये मुळे व्यथित झालेले परतुर तालुक्यातील सर्व समाज बांधवांच्या वतीने देत असलेल्या निवेदनात आमच्या पुढील मागण्या मांडत आहोत. हत्येतील एक आरोपी फरार आहे त्याला तात्काळ अटक करणे. वाल्मीक कराड सोबत सहभागी असलेल्या सर्वांना सह आरोपी करणे. अटकेतील आरोपींना फरार होण्यास मदत करणाऱ्या सर्व आरोपींना सह आरोपी करून अटक करणे. सदरील हत्ये प्रकरणी फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी होऊन फाशीची शिक्षा द्यावी.आमदार धनंजय मुंडे यांच्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करणे तसेच मुंढे ना आमदार पदावरून बडतर्फ करण्यात यावे. या सर्व प्रकरणात आरोपींना मदत करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी ज्यांनी खंडणी व हत्या प्रकरणी कार्यवाही करण्यास विलंब केला. आरोपींना मदत केली अशा सर्वांना तात्काळ बडतर्फ करुन त्यांच्यावर खटला चालविण्यात यावा.फोटोची माहिती दोन महिन्यापूर्वी मुख्यमंत्री यांना असुन पान ३ वर

### प्रशासन आंदोलकांचा जीव जाण्याचा वाट पाहते का?

आज दिवसभर मी, एकनाथ कदम, नवनाथ तनपुरे, व भाऊसाहेब मुके आम्ही सर्वांनी सकाळी दहा ते सायंकाळी सहापर्यंत विनाअन्न व पाणी न घेता तालुक्याच्या वतीने आत्मकलेश अन्नत्याग आंदोलन केले. यावेळी सकाळपासून प्रशासनाच्या वतीने वैद्यकीय पथक आंदोलकांची तपासणी करण्यासाठी पाठवणार असे सांगूनही दिवसभर कोणीही आले नव्हते. याचा अर्थ सरकार व प्रशासन आंदोलकांच्या जीवाशी खेळून एखाद्याचा जीव घेण्याचा प्रयत्न करतोय का असा प्रश्न आमच्या मनात दिवसभर घोळत होता.

**रमेश डाके, आंदोलक**



# संपादकीय पान

## विजेतेपदापासून एक पाऊल दूर

पाकिस्तान आणि दुबईत चालू असलेली एकदिवसीय चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा अंतिम टप्प्यात आली असून अपेक्षेप्रमाणे भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत अंतिम फेरी गाठली. भारताने काल झालेल्या पहिल्या उपांत्य लढतीत पाच वेळेचा विश्व विजेता आणि दोन वेळेचा चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता असलेल्या ऑस्ट्रेलियाला चार गडी राखत सहज नमवले. वास्तविक हा सामना सुरू होण्यापूर्वीच भारत या सामन्याच्या संभाव्य विजेता म्हणून गणला जात होता मात्र क्रिकेट रसिकांच्या मनात कोठेतरी धाकधूक होती कारण ऑस्ट्रेलिया हा संघ भारताला कायम जड गेला आहे विशेषतः आयसीसी स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने कायम भारतावर वर्चस्व राखले आहे. बाद फेरीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला अनेकदा नमवले आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानेच भारताचा पराभव करून विश्वविजेता होण्याचे १४४ कोटी भारतीयांचे स्वप्न धुळीस मिळवले होते. त्याच वर्षी झालेल्या विश्व कसोटी चॅम्पियन्सशिपच्या अंतिम फेरीतही ऑस्ट्रेलियानेच भारताला हरवले होते. इतकेच काय २००३ च्या विश्वचषक स्पर्धेतही ऑस्ट्रेलियानेच भारताने हरवले होते त्यामुळे यावेळीही ते त्याची पुनरावृत्ती करतील की काय ? अशी भीती क्रिकेट रसिकांना होती मात्र भारतीय खेळाडूंनी अप्रतिम खेळ करून ही भिती खोटी ठरवली. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करत २६४ धावा काढल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी अप्रतिम गोलंदाजी करून ऑस्ट्रेलियाचे सर्व फलंदाजांना बाद केले. भारतीय गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी करत ऑस्ट्रेलियाला पूर्ण ५० षटकेही खेळू दिले नाही. गोलंदाजांनी केलेल्या अप्रतिम कामगिरीने भारताचे पन्नास टक्के काम फत्ते झाले होते मात्र फलंदाजी करताना रोहित शर्मा आणि शुभमन गिल ही कर्णधार आणि उपकर्णधारची जोडी स्वस्तात बाद झाल्याने क्रिकेट रसिकांची धाकधूक वाढली पण चेस मास्टर असलेला जगातील सर्वोत्तम फलंदाज असलेल्या विराट कोहलीने मै हू ना.... म्हणत नेहमीप्रमाणे दिमाखदार खेळ करत भारताला विजय मिळवून दिला. संघ अडचणीत असताना विराट कोहलीने ८४ धावांची आकर्षक खेळी करून कांगारू गोलंदाजांची हवा काढून टाकली त्याला श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, के एल राहुल आणि हार्दिक पांड्यने अप्रतिम साथ दिली त्यामुळे भारतीय संघ अंतिम फेरीत पोहचू शकला. भारताने या सामन्यात अप्रतिम खेळ केला. केवळ याच सामन्यात नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने अप्रतिम कामगिरी केली. भारताने या स्पर्धेत खेळलेल्या सर्वच्या सर्व सामन्यात विजय मिळवत अंतिम फेरीचे तिकीट बुक केले. आज म्हणजे ६ तारखेला दक्षिण आफ्रिका व न्युझीलंड यांच्यात दुसरा उपांत्य सामना लाहोरच्या गडाफी स्टेडियमवर होईल. या सामन्यातील विजयी संघ ९ तारखेला विजेतेपदासाठी अंतिम सामन्यात भारताशी लढेल. भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत दिमाखात अंतिम फेरी गाठली आहे. या स्पर्धेतील एकमेव अजिंक्य संघ भारत आहे. या स्पर्धेत एकाही संघाला भारताला नमवण्यात यश आले नाही. विशेष म्हणजे भारताने जिंकलेले सर्वचे सर्व सामने एकतर्फी जिंकले आहेत. प्रतिस्पर्धी संघाला भारताने जराही संधी दिली नाही. गोलंदाजी, फलंदाजी, आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारताने एकहाती वर्चस्व गाजवले आहे. भारताचे सर्व फलंदाज जबरदस्त फॉर्मात आहे. रोहित, विराट, गील, श्रेयस, राहुल सर्वांनीच धावा काढल्या आहेत. हार्दिक पांड्याला मोठी धावसंख्या उभारता आली नसली तरी तो मोक्याच्या वेळी मॅच विनिंग खेळी करू शकतो. उपांत्य फेरीत त्याने ते दाखवून दिले आहे. भारताचे गोलंदाज तर स्वप्नवत कामगिरी करत आहे. भारताचे सर्वच गोलंदाज अप्रतिम कामगिरी करत प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणत आहेत. शमी, पांड्या, जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या भारताच्या गोलंदाजांनी या स्पर्धेत जी कामगिरी केली आहे तशी कामगिरी याआधी भारताच्या कोणत्याही गोलंदाजांनी केलेली नाही. एकाच वेळी भारताच्या सर्व गोलंदाजांमध्ये विकेट घेण्याची स्पर्धा लागली आहे विशेष म्हणजे यात सर्वच गोलंदाज यशस्वी होत आहे. एकाच स्पर्धेत सर्वचे सर्व गोलंदाज भेदक गोलंदाजी करत असल्याचे चित्र प्रथमच पाहायला मिळत आहे. असे म्हणतात की फलंदाज सामना जिंकून देतात तर गोलंदाज स्पर्धा. भारताने या स्पर्धेवर जे एकहाती वर्चस्व गाजवले आहे ते गोलंदाजांमुळेच. गोलंदाजांचा हाच फॉर्म अंतिम फेरीत कायम राहिला तर भारत या स्पर्धेचा विजेता ठरेल यात शंका नाही. आज होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य फेरीत न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका एकमेकांशी झुंझेल. अर्थात न्यूझीलंडचा सध्याचा फॉर्म, अनुभव आणि दक्षिण आफ्रिकेची ऐनवेळी कच खाण्याची वृत्ती पाहता ते दक्षिण अफ्रिकेला मात देऊन अंतिम फेरीत पोहचू शकतात. तसे झाले तर ९ तारखेला भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम सामना रंगू शकतो. अर्थात न्युझीलंड असो की दक्षिण आफ्रिका समोर कोणीही असो भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारताला कोणीही विजयापासून रोखू शकत नाही भारत. उपांत्य फेरी प्रमाणे भारतीय खेळाडूंनी अंतिम फेरीत खेळ केला तर भारतला चॅम्पियन्स होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही एकूणच चॅम्पियन ट्रॉफीच्या विजेतेपदापासून भारत अवघा एक पाऊल दूर आहे. जर भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला आणि नशिबाने साथ दिली तर हे एक पाऊल पार करून भारत १२ वर्षाने चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरु शकतो आणि १४४ कोटी भारतीयांचे स्वप्न साकार करू शकतो. भारतीय संघाला अंतिम फेरीसाठी शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वाढवण बंदर, नवी मुंबई विमानतळामुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**मुंबई** - मुंबई जवळ होत असलेले वाढवण बंदर तसेच नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या उंचीवर जाईल व त्यातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना मोठी चालना मिळेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

'विकसित भारतासाठी लघु - मध्यम उद्योग क्षेत्राचा शाश्वत विकास' या विषयावरील शिखर परिषदेचे उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. ५) मुंबईत झाले, त्यावेळी ते बोलत होते.

परिषदेचे आयोजन महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट असोसिएशन आणि ड्चए चेंबर ऑफ इंडिया यांनी केले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यात लघु व मध्यम उद्योगांचे योगदान महत्वाचे राहील. मोठे उद्योग, लघु उद्योग तसेच सूक्ष्म उद्योग परस्परांना पूरक असतात त्यामुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग वाढले तर त्यांनी मोठ्या उद्योगांना देखील मदत होईल असे राज्यपालांनी सांगितले.

विकसित भारताचे लक्ष गाठण्यासाठी देशातील प्रत्येक व्यक्तीला आपले योगदान देणे आवश्यक आहे. जपानच्या प्रगतीमध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे योगदान फार मोठे आहे. औद्योगिक विकासात लघु आणि मध्यम उद्योगांची भूमिका अतिशय महत्वाची असून या दृष्टीने ड्चए चेंबर लघु उद्योगांना सक्षम करण्याचे उत्तम कार्य करीत आहे.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी राज्यातील विविध लघु आणि मध्यम उद्योगांना २३ वे इंडिया ड्चए उत्कृष्टता पुरस्कार आणि १४ वे प्राइड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रीय लघु व माध्यम उद्योग उत्पादकता अभियान, ड्चए टीव्ही आणि ड्चए लीगल सेलचे उद्घाटन करण्यात आले.

महाराष्ट्र इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट असोसिएशनने आपल्या रौप्य महोत्सवी स्थापना दिवसानिमित्त तसेच ड्चए चेंबर ऑफ इंडियाच्या ३२ वा स्थापना दिनानिमीत्त या परिषदेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाला ड्चए चेंबरचे संस्थापक आणि अध्यक्ष चंद्रकांत साळुंखे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एएचआय मीडिया लॅबोरेटरीजचे अध्यक्ष डॉ. जी. एम. वारके, चखऊचे मुख्य सल्लागार मोहन राठोड, उपाध्यक्ष सुदेश वैद्य, एल अँड टी - सुफिन लिमिटेडचे भद्रेश पाठक यांसह उद्योजक व महिला उद्योजक उपस्थित होते.

# समाजात महिला सुरक्षित नाहीच !

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा ! भारत हा पुरुष प्रधान देश असला तरी स्त्री शक्तीचा आदर करणारा देश आहे. आज जगातील प्रत्येक महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व जबाबदाऱ्या स्विकारणारी एक अनुभूत शक्ती आहे. असे म्हटले तरी अतिशीक्ती होणार नाही. महिला ही अशी शक्ती, ताकद आणि स्फूर्ती आहे. की कुणाही कमजोर व्यक्तीला सांभाळून घेणारी माता आणि भगिनी आहे. कारण कुटुंबाची सर्वात जास्त काळजी घेणारी व्यक्ती म्हणजे स्त्री होय. 'जेव्हा कधी एखादी स्त्री आजारी पडते ना.. तेव्हा तिचं पहीलं टेन्शन तिचं स्वतःचं आजारपण नसतं तर तिच्या कुटुंबियांच्या जेवणाचं असतं.' अशी काळजी करणारी महिला नसेल तर कुटुंबाची वाताहात होते. कारण आपल्या चिंताग्रस्त पतीला, मुलाला कोणत्याही प्रसंगाच्या वेळी नेहमी खंबीरपणे सांगते मी आहेना तु घाबरु नकोस. या शब्दात एवढी ताकद आहे की कमजोर व्यक्तीला कोणतेही आव्हान उचलण्यासाठी एक प्रकारची स्फूर्ती देणारी ही कुटुंबातील माता किवा भगिनी होय. आपण अनेक घरात वरील वाक्य नेहमीच उच्चारले जाते. आजच्या डिजिटल युगात महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. याची जाणीव ठेऊन केंद्र सरकारने महिलांना आरक्षण देणारे विधेयक मंजुर करुन तमाम स्त्रीवर्गाला बहुमान दिलेला आहे. या आरक्षणा बरोबर समाजात सन्माननिय वागणूक मिळाली तरी पुरेशे आहे. काळजी घे हा शब्द काळजातून निघतो. आपल्या परक्यांची जाण करुन देतो. कोणीतरी आहे आपल्यासाठी झुंजणारं, कोणीतरी आहे आपल्यासाठी रडणारं या भावनांनी घरातील कर्त्या पुरुषाचा जीव सुखावतो. काळजी घे या शब्दातच आपलेपणा दरवळतो. आणि हे शब्द असतात ते घरातील माता - बहिणीचे. ज्या वेळी घरातील मुले किवा कर्ता घराबाहेर जातो तेव्हा मायेने बोलणारी ही घरातील कर्ती स्त्री असते. त्यामुळे घरातील कर्त्या व्यक्तीला वेगळी उर्जा मिळते. त्यामुळे ती व्यक्ती सफलते कडे प्रवास करते. ती लहान मुलांना घडवणारी एक अदभूत शक्ती असते.

नम्रता हा गुण सर्व गुणांपेक्षा जास्त किंमती व मौलवान आहे. तो ज्याच्याकडे आहे त्याच्या भोवती कितीही बलाढ्य स्पर्धक असले तरी ती आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो. कारण 'व्यवहार हा घरातील शुभकलश आहे, इंसानियत घरातील तिजोरी आहे, मधुर वाणी घरातील धन दौलत आहे, शांती घरातील महालक्ष्मी आहे, पैसा हा घरातील क्षणीक पाहूणा आहे, एकता घरातील ममता आहे, व्यवस्था घरातील शोभा आहे आणि समाधान हे घरातील खरे सुख आहे.' हे सर्व टिकवण्यासाठी घरातील स्त्रीला मुक्तता हवी. तसे पाहिले तर हे सर्व गुण घरातील स्त्रीकडे असतातच असतात. त्यांच्यामुळेच आपण सुखी व समाधानी आहोत.

महिलांवर आजही दिवसा ढवळ्या अत्याचार होत आहेत. ते थांबले पाहीजे. त्यासाठी सरकारने आरक्षणा बरोबर त्यांना सुरक्षितता द्यायला हवी. तरच आजची स्त्री ताठ मानेने कुठेही आणि कधीही फिरु शकेल. आज घरातील स्त्री किंवा मुलगी बाहेर गेली तर ती घरात येई पर्यंत घरातील इतर व्यक्तींच्या जीवात जीव नसतो. कारण ती आज खरोखरच सुरक्षीत आहे का ? असा प्रश्न सर्वानाच पडलेला आहे. म्हणून आरक्षणाबरोबर महिलांना समाजात स्वैर आणि स्वच्छंदी जगण्याचा सुरक्षीत मुलभूत हक्क प्रथम द्यायला हवा. स्त्रीला आरक्षण देवून देवी बनवून बंदिस्त करण्यापेक्षा तिच्या पंखाना बळ देवून तिला मुक्त विहार करु द्या. हीच या जागतिक महिला दिनाची फार मोठी भेट महिलांना दिली पाहीजे.



महिलांना चार वेदांचे अर्थ नाही समजले तरी चालेल पण समजदारी, जबाबदारी, वफादारी आणि इमानदारी या चार शब्दांचे मर्म समजले तरी आपले जीवन सार्थकी लागेल असे सर्व महिला समजतात. जगातील महिलांच्या महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयांचेच नव्हे तर प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे ते स्त्रीयांचे संरक्षण करण्याचे. कारण आपणच म्हणती की बेटी बचाव - बेटी पढाव. म्हणून प्रत्येकाने स्त्रीयांच्या कर्तृत्वाला दाद देवून आपण सर्वानी स्त्रीयांचा आदर केला तरच जागतिक महिला दिन साजरा केलाचा आनंद व्यक्त करुन ती उत्साहात साजरा झाल्याचे समाधान मिळेल !

**दत्ताराम दळवी**
**लालबाग, ९८२०५२७८५५**


# शब्दांचे कोडं

**आडवे शब्द**

१. 'ऐक्यामध्ये शक्ती असते' या अर्थाची म्हण
६. सोने
१०. सोललेल्या उसाचे आडवे तुकडे
११. चंद्र न उगवण्याची तिथी
१२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१४. सत्ता
१५. दफनभूमी
१६. भला, चांगला
१७. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
१८. नम्रतेने वागणारा
२१. स्तुतीची गाणी
२३. गोदाम, माल साठविण्याची जागा
२५. कसोटी
२७. वर्ष, साल
२८. वालुकामय प्रदेश
२९. राजसभा
३०. बारीकसारीक
३२. थडगे
३३. तृष्णा
३५. लीनता
३७. जाड कापडाची बैठक
३९. जैन साधु
४१. चंदन उगाळण्याचा दगड
४२. कवी
४४. मदन
४७. फसविले जाणे
४९. परमेश्वर
५०. शिकार
५२. सभेपुढे न घाबरता बोलणारा
५३. बूड
५५. रत्न
५७. निपचित, निमूट
५९. मडके
६१. रावणाच्या तोंडाची संख्या
६३. पायंडा, पद्धत
६६. शिव्याशाप
६७. दिवस उजाडायच्या आत
६९. पाठविलेला, मार्गस्थ
७२. दरोडा
७३. दुःख
७४. अनेकांना पैसे देणे असलेला
७५. प्रजा

**उभे शब्द**

१. अर्जुनाचा प्रतिस्पर्धी, द्रोणाचार्यांनी नाकारलेला शिष्य
२. डुक्कर
३. मत्सर
४. अव्यवस्था, गोंधळाचे राज्य
५. सारखा
६. हसू येण्याजोगा
७. मग आल्यामुळे या जोडीची फारकत झाली!
८. अदृश्य, नजरेसमोरून नाहीसे होणे
९. चणचण, न्यूनता
११. अव्यवस्थित, नेटकेपणाने न ठेवलेले
१३. उंबरठा
१५. मिठी
१८. उग्र वासाचे आंबडगोड चवीचे फळ
१९. शक्तीमान
२०. आकाश, नभ
२२. कापड, वस्त्र
२३. पराकाष्ठेचा लाभ
२४. शुष्कता
२५. पुन्हा
२६. धुणे (पाप इ.)
२९. स्मशान
३१. जयपराजय
३४. अक्षरओळख असलेला
३६. चंद्र, शंकर
३७. उत्सवाचे दिवस
३८. रंगविलेले
४०. भांडणाची कळ
४१. वर्ष, साल
४३. व्यवस्था, काम पाहणे
४५. नवी (हिंदी)
४६. शहाणा, हुशार
४७. स्पष्टवक्ता
४८. वाईट, अनिष्ट
५१. आच, उष्णता
५२. नातेवाईक
५४. अंगरखा
५६. वाकलेला, नम्र
५८. सोंगट्यांचे वस्त्र
६०. रात्रभर
६२. घण
६४. हिंदुस्तान
६५. पोळ्या भाजण्याचे साधन
६६. सिद्धता
६८. पौर्णिमा
७०. श्वसनेंद्रिय
७१. वडिलांचे मराठी संबोधन



**कालचे आडवे उत्तर** १.कलागत ४.सभागार ७.तिलोत्तमा ११.रजत १३.शाळा १४.हुतात्मा १५.क्षमा १७.वीरगती १९.कसरत २०.सावज २२.जयजवान २५.मोद २८.वारा २९.वचक ३१.क्षपणक ३४.आजकल ३५.वरदा ३७.रद ३८.दमट ४०.सरतेशेवटी ४३.तारस्वर ४४.पादुका ४६.वानर ४७.रमावर ५०.आड ५१.नख ५४.काका ५५.पागलखाना ५९.परवचा ६२.वखार ६४.दरसाल ६५.खटमल ६६.दानवीर ६८.यक्ष ६९.दादा ७०.वासर ७१.स्तवन ७३.लघळभवानी ७७.कळ ७८.खासदार ८०.कान ८१.मदनबाण ८४.वारसदार ८५.मसलत ८६.काव **कालचे उभे उत्तर** १.कटाक्ष २.गर ३.तजवीज ५.भारतीय ६.रवाखवा ७.काळा ८.लोकसत्ताक ९.माहुत १०.आत्मा १२.तर १६.मासा १८.गजरा २१.वहाण २३.जयजयकार २४.नवल २६.दमदाटी २७.साक्षरता ३०.पावशेर ३२.पदरमोड ३३.कदरदान ३६.रव ३९.टपाल ४१.रवा ४२.तेनसिंग ४५.कावकाव ४८.माका ४९.सखा ५०.आपादमस्तक ५२.खप ५३.चावट ५५.पार ५६.लहानसहान ५७.नागर ५८.रसायन ६०.रखवालदार ६१.चामखीळ ६३.खानदानी ६४अ.लक्ष ६६.दावा ६७.वीर ६९.दावानल ७२.वळवा ७४.भकास ७६.कणव ७८.खास ७९.सदा ८२.दशा ८३.बाका

## मंठ्यात बिनटाका कुटुंब नियोजन शिबीर संपन्न



**मंठा । प्रतिनिधी -** वाढते लोकसंख्या ला आळा घालणे साठी आरोग्य विभागाने वतीने विविध उपाययोजना केल्या जातात या मध्ये तात्पुरते कुटुंब नियोजन साधने तसेच कायमस्वरूपी नसबंदी स्त्री / पुरुष टाका / बिनटाका शस्त्रक्रिया करतात त्या नुसार आज ग्रामीण रुग्णालय मंठा येथे स्त्री बिनटाका शिबिर मध्ये २५ महिलाचे संपन्न झाले सदरील शिबीर मध्ये सर्व लाभार्थ्यांना पंलग गादी बँलेकेट पाणी ची व्यवस्था करण्यात आली होती ..हे शिबीर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ जयश्री भुसारे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ नारायण पवार वैद्यकीय अधिक्षक डॉ राजेंद्र गायके तालुका आरोग्य अधिकारी डॉ जगन्नाथ कुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ कांचन कांगणे डॉ शिवाजी निलवर्ण डॉ अमर मोरे डॉ खरात आरोग्य सहाय्यक सुजीत वाघमारे विलास देशमुख सचिन वैराळ राहुल हनवते श्रद्धा हजबे यांच्या सह प्राथमिक आरोग्य केंद्र ढोकसाळ / पाटोदा / तळणी येथील समुदाय आरोग्य अधिकारी आरोग्य सेवक / सेविका / गटपर्वेतक /ग्रामीण रुग्णालया मंठा येथील अधिपरीचारीका / आशा स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले

# जवखेडा ठोंबरी येथील एका कुटुंबावर बहिष्कार

## कुटुंबीयाची जिल्हा प्रशासनाकडे धाव; आंबेडकरी नेत्यांनी घेतला पुढाकार

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात असलेल्या जवखेडा ठोंबरी या गावातील एका कुटूंबावर बहिष्कार घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलाय. या संदर्भात पिडीत कुटुंबाने जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली असून न्याय देण्याची मागणी केलीय. या पीडित कुटुंबाच्या मदतीसाठी आंबेडकरी नेत्यांनी पुढाकार घेतला असून सोमवार दि. ३ मार्च २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आणि सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांची भेट घेत सुरक्षा आणि न्याय देण्याची मागणी केली.

जवखेडा ठोंबरे येथील मंडाबाई भाऊराव वाघ रा. जवखेडा ठोंबरे, ता. भोकरदन जि. जालना यांच्या मुलाने मुलीची छेड काढल्याच्या कारणावरुन गावातील काही लोकांनी त्यांच्या जवखेडा ठोंबरी शिवारातील गट नं. १६८ मध्ये लागवड केलेल्या पिकाची नासधुस केली. शिवाय त्यांच्या शेतात उत्खनन करुन शेतीचे नुकसान केले. शिवाय कुटुंबावर बहिष्कार टाकला असून त्यांना गावात कोणत्याही सोई सुविधा दिल्या जात नाहीत. त्यांना दैनंदिन गरजेच्या वस्तु तसेच वाहतुक करणार्या वाहनातही बसू दिले जात नाही. या कुटुंबातील एका मुलीची १० वी ची परिक्षा सुरु आहे. तीला परिक्षेसाठी जाण्यासाठी गाडीत बसू दिले जात नाही. हा सर्व प्रकार या पिडीत कुटुंबाने जिल्हा प्रशासनासमोर कथन केलाय. यावेळी आंबेडकरी समाजाच्या नेत्यांनीही पुढाकार घेत न्याय देण्याची मागणी केली. ॲड. शिवाजीराव आदमाने, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, फकीरा वाघ यांनी जिल्हाधिकारी, अप्पर पोलीस अधिक्षक, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांची भेट घेऊन पिडीत कुटुंबाला न्याय देऊन पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली. शिवाय स्थानिक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हे तक्रार दाखल करुन घेत नसल्याने त्यांना दुरध्वनीवरुन संपर्क साधून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

**पोलीसांनी तक्रार घेतली नाही**

पिडीत कुटुंबाच्या गायरान जमीनीतून सोमनाथ साहेबराव ठोंबरे हे काळी माती, मुरूम, डब्बरचे उत्खनन करून विकण्याचे काम करीत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. शिवाय त्यांनी २००४-२००८ मध्येही पिकाची नासधूस केली होती. त्या प्रकरणीही गुन्हा दाखल आहे. त्यानंतर त्यांनी त्रास दिला नाही. परंतु, मागील वर्षापासून त्यांनी पुन्हा त्रास द्यायला सुरुवात केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तक्रार देण्यासाठी पिडीत भोकरदन पोलीस ठाण्यात गेले. परंतु, त्यांची तक्रार घेतली नाही. त्यामुळे त्यांनी थेट समाज आणि जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली.

**आंबेडकरी समाज धावला... तिव्र आंदोलनाचा इशारा**

दरम्यान भोकरदन तालुक्यात एका दलित कुटुंबावर जर बहिष्कार टाकला जात असेल तर तो भयंकर प्रकार आहे. त्यामुळे आंबेडकरी समाजाचे प्रतिष्ठीत नेते ॲड. शिवाजीराव आदमाने, ॲड.ब्रम्हानंद चव्हाण आणि फकीरा वाघ यांनी पिडीत कुटुंबासाठी पुढाकार घेत जिल्हा प्रशासनासमोर पिडीत कुटुंबाची व्यथा मांडली. दोषीवर कारवाई करा अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही आंबेडकरी समाजाच्या नेत्यांनी दिला.

## जालना लॉयन्स क्लबने २३ विविध पुरस्कार मिळवून रचला नवा इतिहास

# जयश्री लड्ढा बेस्ट प्रेसीडेंट अवॉर्डने सन्मानित

**जालना । प्रतिनिधी -** लायन्स क्लब ऑफ जालनाने सेवाभावी कार्याच्या बळावर महाकुंभ रीजन कॉन्फरन्समध्ये अभूतपूर्व कामगिरी करत २३ विविध पुरस्कार पटकावले. रीजन एकदंतचे रीजन चेअरपर्सन संजीव गुप्ता यांच्याहस्ते क्लबला आणि पदाधिकाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. हा भव्य सोहळा २ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला.

यावेळी लायन्स क्लब जालनाच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करत अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष कल्पना बियाणी, प्रथम उपाध्यक्ष राधेश्याम टिबडेवाल, लायन्स ईन्फार्मे लायन अरुण मित्तल आणि लायन ऑफ द रीजन अतुल लड्ढा यांना सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. झोन चेअरपर्सन राजेश दुनिया यांनाही विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी लायन्स क्लब जालनाच्या उल्लेखनीय कार्याचा ... (see above)




लायन्स क्लब जालनाने लीडरशिप अवार्ड, एलसीआयएफ डोनेशन अवार्ड, सर्विस प्रोजेक्ट अवार्ड, बेस्ट ऍक्टिव्हिटी अवार्ड, लहान मुलांचे कॅन्सर अवेयरनेस अवार्ड, मुलींसाठी कॅन्सर प्रतिरोधक लसीकरण अवार्ड, डायबेटीस अवेयरनेस अवार्ड, एन्व्हायर्नमेंट अवार्ड, फीड द हंगर अवार्ड, आय चेकअप आणि कॅटरॅक्ट ऑपरेशन अवार्ड, बेस्ट फोटो डिस्प्ले अवार्ड, बेस्ट बॅनर प्रेझेंटेशन अवार्ड, बेस्ट परमनंट प्रोजेक्ट, वुमन एम्पावरमेंट (महिला सशक्तीकरण) अवार्ड यांसारखे २३ प्रतिष्ठित पुरस्कार जिंकत उल्लेखनीय कामगिरी.

अध्यक्ष जयश्री लड्ढा आणि सचिव मंजू श्रीमाली यांनी आपल्या प्रभावी भाषणातून संपूर्ण वर्षभरातील उल्लेखनीय कार्याचे सादरीकरण केले. त्यांच्या या प्रभावी सादरीकरणामुळे त्यांनाही विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या भव्य सोहळ्याला जालन्यातून माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरीया, जयप्रकाश श्रीमाली, विजय दाड, द्वारकादास मुदंडा, मीनाक्षी दाड, संगीता भक्कड, श्याम लोया, अनीता देवीदान, रतन बजाज, संगीता रुणवाल, कमलकिशोर झुनझुनवाला, दिनेश लोहीया, भारती लोहिया, दिनेश चांडक, संजय खंडेलवाल, रीना खंडेलवाल, राजेश पित्ती, स्मिता पित्ती यांच्यासह पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या अभूतपूर्व यशामुळे जालना लॉयन्स क्लबने आपल्या सामाजिक कार्याची ताकद सिद्ध केली आहे. हा गौरव भविष्यातील सेवाकार्यासाठी प्रेरणादायी आणि अधिक कार्यक्रम राबविण्यासाठी ऊर्जा देणारा ठरेल, असा विश्वास अध्यक्ष जयश्री लड्ढा यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र राज्य मनुस्मृती नुसार चालत का? सपाचा सवाल

**पुणे -** महापुरुषांवर टीका करणे ही बाब चुकीचीच आहे. मग टीका करणारा तो कोणताही पक्ष, पंथ, जाती धर्माचा असो...! समाजवादी पक्षाचे विधायक अबू आजमी यांच्यावर तत्काल कारवाई झाली परंतु राहुल सोलापूरकर आणि डॉ. प्रशांत कोरटकर यांच्यावर कारवाई का केली जात नाही..? आम्ही स्वतः पुणे शहर कार्यकारणीच्या वतीने त्यांच्या वक्तव्याचा पिंडदान आंदोलन करून निषेध केला होता. एकावर कारवाई तर दुसऱ्याची पाठ राखण हे संविधानाला धरून न्याय सांगत नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात मनुस्मृती नुसार सरकार प्रशासन काम करताय का असा सवाल उपस्थित होतो. जर नसेल तर लवकरात लवकर राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांच्यावर तत्काल कारवाई करा अशी मागणी समाजवादी पक्षाचे पुणे शहर अध्यक्ष जांबुवंत सागरबाई मनोहर यांनी केली आहे.

## मंठा येथे बीईओ कुलकर्णी हजर



**मंठा । प्रतिनिधी -** येथील नूतन गटशिक्षणाधिकारी विवेकानंद कुलकर्णी यांनी ५ मार्च रोजी उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत यांच्या उपस्थितीत येथील गट साधन केंद्राचा पदभार स्वीकारला.

याप्रसंगी गट समन्वयक के.जी.राठोड, भगवान बोराडे, सदाशिव तोटे, प्रमोद देशमुख, सुनील राठोड, शामसुंदर मनाळकर, रामचंद्र खंदारे इतर शिक्षक व कर्मचारी यांनी कुलकर्णी यांचे स्वागत केले.

पान १ वरुन

### महाबोधी महाविहार ...

संघटना आक्रमक झाल्या आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील बौध्द अनुयायी देखील न्याय हक्कासाठी आणि महाबोधी महाविहार हे बौध्दांच्या ताब्यात देण्यासाठी जिल्हा कचेरीवर धडकणार आहेत. या आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे असे आहवान पू. भन्ते शिवली शाक्यपुत्र यांनी केले आहे.

### रमजान निमित्ताने ...

औचित्य साधून माहे मार्च २०२५ चे वेतन ईद पूर्वी म्हणजे २० ते २२ मार्च यातारखेपर्यंत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा व्हावेत, या अनुषंगाने शासनाने तत्काळ वेतन निधी उपलब्ध करून वेतन प्रक्रिया सुरू करणेबाबत सूचना सर्व शिक्षण विभागांना देण्यात याव्यात आणि संबंधित अधिकाऱ्यांना वेतन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या अंमलबजावणीबाबत आदेश देण्यात यावे अशी विनंती करण्यात आली आहे. जेणेकरून राज्यातील तमाम मुस्लिम शिक्षक बांधवांची ईद गोड होईल.

### युवक-युवतींसाठी ...

विकास प्रशिक्षण कार्यक्रम व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन विभागीय स्तरावर छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी करण्यात आले आहे. तरी प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये जालना जिल्ह्यातून २० लाभार्थींना गुरुवार दि. ६ मार्च २०२५ रोजी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड करून निवासी प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार आहे.

तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १) सीएनसी मशीनिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग) २)थ्रीडी प्रिंटिंग अँड रिव्हर्स इंजीनियरिंग (अनुसूचित जाती प्रवर्ग) ३) फूड अँड प्रोसेसिंग (अनुसूचित जमाती प्रवर्ग) ४)सोलर पीव्ही टेक्निशियन (अनुसूचित जमाती प्रवर्ग) इत्यादी टेक्निकल प्रशिक्षण कोर्स आयोजित करण्यात आले आहेत. प्रशिक्षण कार्यक्रम हा दि. १७ मार्च २०२५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ४५ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दि. ६ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ६ मार्च २०२५ असून याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रवेश अर्ज भरलेल्या लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा- मराठा बिल्डींग (पार्क), विशाल कॉर्नर छत्रपती संभाजीनगर चौफुली, जालना या ठिकाणी निवड करण्यात येणार आहे. असे प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### विधी शिक्षण ...

दिली गेली होती. आता पुन्हा एकदा मुदत वाढवत १७ मार्च पर्यंत अर्ज करता येणार आहे. यंदा एलएलबी ३ वर्षे अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा ४ मे रोजी आणि एलएलबी ५ वर्षे अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २८ एप्रिल रोजी होणार असल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले आहे.

जे विद्यार्थी कायद्याच्या क्षेत्रात करिअर करू इच्छितात, त्यांनी ही संधी दवडू नये. कायदा शिक्षण घेतल्याने मानवी हक्क संरक्षण, पर्यावरण कायदे, कॉर्पोरेट लॉ यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये उज्ज्वल संधी उपलब्ध होतात. तसेच, विद्यार्थी न्यायिक सेवा, सरकारी वकील, कायदा सल्लागार यांसारख्या पदांवर काम करू शकतात. राज्य सामाईक प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वतयारी म्हणून कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीइटी) देणे बंधनकारक आहे. त्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरून ही संधी साधावी. अधिक माहितीसाठी विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळाला द्यावी, अर्ज भरण्यासाठी काही माहिती हवी असल्यास मार्गदर्शन केले जाईल, असे ड. धन्नावत यांनी म्हटले आहे.

### अक्षम्य असंवेदनशील ...

व अधिवेशनात चर्चा होऊनही सरकारने या प्रकरणी धनंजय मुंढे यांचा राजीनामा घेण्यास विलंब केला. संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी, महादेव मुंडे, हत्या, पुणे येथील महिला वर झालेला बलात्कार व समाज कंटक राहुल सोलापूरकर, प्रशांत कोटकर, यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल जाणून बोलून बदनामी करणारे वक्तव्य केले. त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी त्यांना सरकारच्या वतीने पोलीस संरक्षण देण्यात आले. राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे संविधानिक पदावर असूनही नेहमी धार्मिक तेढ निर्माण करणारे वक्तव्य करीत आहेत. ही परिस्थिती पाहता लवकरच राज्यात अराजकता माजल्या शिवाय राहणार नाही. त्यामुळे हे सरकार बरखास्त करण्यात यावे. नाश्ता सकाळ मराठा समाज व इतर सर्व समाजाच्या वतीने लवकरच उग्र आंदोलन केले जाईल याची नोंद घेणे अशी ही विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या एक दिवशीय आत्मक्लेष अन्नत्याग आंदोलनात एकनाथ कदम रमेश डाके सचिन खरात भाऊसाहेब मुके वैजनाथ दादा बागल किरण मुळे, गोविंद रसाळ गणेश राजबिंडे शिवाजी महाराज भोसले पांडुरंग नवल नवनाथ तनपुरे अशोक गारकर सचिन मस्के महेश नळगे रवी देशमुख रामकिसन मोरे दिनेश तेलगळ माधवराव कदम नामदेव धुमाळ गजानन चवडे राजेभाऊ जगताप दत्ता अंभोरे आबा कदम रामेश्वर देशमुख दत्ता शोरूम सह तालुक्यातील शेकडो संवेदनशील बांधवांनी सहभाग घेतला होता.

# देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला मदत करणाऱ्यांना फाशी होणार का?

८५ दिवसांच्या थरार मध्ये सरपंच संतोष देशमुखांची निर्घृण हत्या व खंडणी वसूल प्रकरणाने राज्याच्या राजकारण्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचे दिसून येते.कायदा म्हणतो की गुन्हेगारापेक्षा त्याला मदत करणारा सर्वात मोठा गुन्हेगार असतो.मग सरकार वाल्मिक कराडला मदत करणाऱ्या संपुर्ण दिग्गज नेत्यांना फाशी देणार का? हाही महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो.याच अनुषंगाने बीड जिल्ह्यात वाल्मिक कराडच्या नेतृत्वात जी गुंडागर्दी सुरू होती आणि त्याला खतपाणी घालण्याचे काम जे राजकीय पुढारी करीत होते व त्यांचा दबदबा कायम होता अशांना वाल्मिक कराडच्या पंगतीत बसवुन फाशी किंवा कठोर शिक्षा होणार का? हा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण न्यायालयाने संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संपुर्ण पुराव्यांच्या आधारे वाल्मिक कराडला गुन्हेगार व दोषी घोषित केले आहे. परंतु या प्रकरणात फक्त वाल्मिक कराड पर्यंत सिमीत राहुन चालणार नाही, तर कराडला मदत करणाऱ्या संपुर्ण नेत्यांना कराड सोबत फाशीची शिक्षा होने गरजेचे आहे.कारण गुन्हेगारीची मुख्य जड राजकारणातुनच निर्माण झाली आहे आणि होत असते हे संतोष देशमुख यांच्या हत्तेवरून लक्षात येते. राज्यात गुन्हेगारीला प्रवृत्त करण्याचे काम राजकीय पुढारीच करीत असतात हीबाब निवडणूकी दरम्यान सर्वांच्याच लक्षात येते. त्यामुळे गुन्हेगार निर्माण करण्याची व त्याला अंजाम देण्याचे काम राजकीय वर्तुळातुन तयार होत असते. त्यामुळे याप्रकरणात सर्वप्रथम राजकारण्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे.अन्यथा राज्यात हजारो कराड निर्माण होवुन संतोष देशमुख सारख्या भयावह घटना सर्वांच्या डोळ्यासमोर होवू शकतात यालाही नाकारता येत नाही. सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे धनंजय मुंडेंनी अचानक राजीनामा का द्यावा!धनंजय मुंडेंचा राजीनामा म्हणजेच वाल्मिक कराडचा मदतगार आहे हे सिद्ध होते.धनंजय मुंडेनी राजीनामा दिला याचा अर्थ राज्यावर किंवा राज्याच्या जनतेवर उपकार केलेला नाही हेही बाब धनंजय मुंडेंनी लक्षात ठेवले पाहिजे.तसे पहाले तर सध्याच्या परिस्थितीत धनंजय मुंडेंना राज्याच्या कोणत्याही संविधानीक पदावर राहण्याचा तिळमात्र अधिकार नाही.ही बाब त्यांच्या कृतीतून स्पष्ट दिसून येते.आता धनंजय मुंडेंनी मंत्री पदाचा राजीनामा दिला आहे.परंतु त्यांना सध्याच्या परिस्थितीत आमदारकी पदावर सुध्दा रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही. कारण धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड आहेत व देशमुख हत्या प्रकरण वाल्मिक कराड दोषी घोषित झाले आहेत त्यामुळे ताबडतोब धनंजय मुंडेंनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे यावरून सिद्ध होते की वाल्मिक कराड प्रमाणेच धनंजय मुंडे सुध्दा तीतकेच दोषी आहेत.त्यामुळे त्यांची आमदारकी ताबडतोब रद्द करून फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून त्यांच्यावर कारवाई करून कठोर शिक्षा व्हायला हवी.धनंजय मुंडे म्हणतात की माझी प्रकृती ठीक नसल्याने व काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिल्याने वैद्यकीय कारणास्तव मी मंत्रीपदाचा राजीनामा देत आहे ही तर हास्यास्पद बाब म्हणावी लागेल!एकीकडे त्यांचे नेता अजित पवार म्हणतात की, नैतिकतेच्या आधारावर मुंडेंनी राजीनामा दिला, वाल्मिक कराडला मदत करणे ही कोणती नैतिकता म्हणावी! याचाही विचार अजित पवारांनी करायला हवा. गुन्हेगारांना खतपाणी घालने याला कोणती नैतिकता म्हणावी!हीबाब अजित पवारांनी राज्याच्या जनतेला समजून सांगावी! ही कीती हास्यास्पद बाब म्हणावी.म्हणजे राजकीय पुढारी गुन्हेगारीतुन सुटका करण्यासाठी कीती खोटे बोलतात आणि पळवाटा काढतात हे यावरून स्पष्ट होते.तसे पहाले तर धनंजय मुंडे स्वतः या हत्याकांडात गुरफटले असल्याचे त्यांच्या राजीनाम्यावरून स्पष्ट दिसून येते.यावरून असे म्हणायला हरकत नाही की, राज्यात वाल्मिक कराड सारख्या अनेक अट्टल गुन्हेगारांना राजकीय पुढारी अवश्य खतपाणी घालत असावेत तेव्हाच राज्यात अशा भयावह घटना होत आहे असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे आता प्रशासनाने व सरकारने ठरविले पाहिजे की गुन्हेगारांसोबत त्यांना मदत करणाऱ्या सर्वांनाच कठोर शिक्षा किंवा फाशीची शिक्षा व्हायला हवी तो व्यक्ती लहान किंवा मोठा याकडे लक्ष न देता प्रशासनाने कारवाई करावी व याबाबतीत पोलिस विभागाला खुली सुट द्यावी.संतोष देशमुख हत्याकांडावरून स्पष्ट होते की राज्यात अनेक बाहुबली राजकारणी आहेत तेव्हाच राज्यात बलात्कार, खंडणी वसुली,अत्याचार, हत्या,अशा भयावह घटना वारंवार होतांना दिसतात.राज्यात सर्वसामान्यांच्या मुली सुरक्षीत तर नाहीच परंतु मंत्र्यांच्या मुली सुद्धा सुरक्षीत नाही हे राज्याचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.त्यामुळे महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, गृहमंत्री, राज्यपाल यांना नम्र विनंती आहे की महाराष्ट्र होत असलेल्या घटनांवर करडी नजर ठेवून योग्य ती कारवाई करावी. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**

# मराठा आंदोलकांचा रास्ता रोको

## संतोष देशमुखांच्या हत्येचा निषेध; आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** नांदेड महामार्गावर मराठा आंदोलकांनी रास्ता रोको आंदोलन केले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखांच्या हत्येच्या निषेधार्थ हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. संतोष देशमुख हत्ये प्रकरणातील फरार आरोपींना लवकर अटक करण्यात यावी त्याच बरोबर सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. जालन्याच्या जालना - नांदेड महामार्गावरील रामनगर येथे हे आंदोलन करण्यात आले आहे. आंदोलनादरम्यान राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली. घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर अवघ्या महाराष्ट्रात तीव्र प्रतिसाद उमटत आहेत. मराठवाड्यातील बीड, जालना जिल्ह्यात मराठा समाजासह इतर समाजानेही या घटनेचा निषध व्यक्त करत आरोपींना तात्काळ अटक करुन गंभीर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

# झोपडपट्टी धारकांना पी. आर. कार्ड साठी सर्वपक्षीय बैठक घेणार - रावसाहेब दानवे

## स्व.बालचन्द्र भुरेवाल प्रवेशद्वाराचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील झोपडपट्टी धारकांना हक्काचे पी .आर .कार्ड मिळवून देण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन तोडगा काढणार असल्याची माहिती माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी दिली.

आनंदेश्वर महादेव मंदिर आणि दक्षिणमुखी हनुमान मंदिराजवळ स्व.बालचन्द्र भुरेवाल प्रवेशद्वाराचे उदघाटन रविवारी ( ता. ०२) रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ.कैलास गोरंट्याल, शिवसेना उ. बा. ठा. चे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, रमेशभाई पटेल, जिल्हा उपाध्यक्ष भास्करराव दानवे ,माजी उपनगराध्यक्ष तथा संयोजक हेमराज भुरेवाल, बाला परदेशी,सिध्दीविनायक मुळे, सतीश जाधव, धनराज काबलिये, सुनील खरे , विजय कामड, रवि इंचे आयोजक नेमीचंद भुरेवाल, संदीप नाईकवाड़े यांची उपस्थिती होती.

रावसाहेब दानवे यांनी झोपडपट्टी धारकांच्या हक्कांसाठी लढणारे स्व.बलीराम यादव यांच्या कार्यास उजाळा दिला. माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी रेल्वे स्थानकाजवळ क्रीडांगण विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी केली.

शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी पन्नास टक्के जनता झोपडपट्टी भागात राहत असून पी. आर. कार्ड नसल्याने शासनाच्या



घरकुल योजनेचा लाभ त्यांना मिळत नाही. पदावर नसले तरीही रावसाहेब दानवे यांचे केंद्र आणि राज्य शासनात मोठे वजन आहे. शहरातील झोपडपट्टी भागात विकास कामांसाठी आपले वजन वापरावे अशी साद अंबेकर यांनी दानवे यांना घातली.

प्रास्ताविक नेमिचंद भुरेवाल यांनी तर सूत्रसंचालन रविकांत जगधने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हेमंत भुरेवाल, बंकटलाल खंडेलवाल, नवीन भुरेवाल, राजेश पडोळे,प्रकाश घोडे पाटील,संतोष शिकारे, सुभाष आढाव, अशोक देशमुख, पंकज भुरेवाल, बद्री जेथलिया, गेंदालाल झुंगे ,अमोल पूर्वे, राजू बसंते, दीपक यादव, सचिन भुरेवाल, गोविंदा भुरेवाल, निलेश भुरेवाल, सोनु खंडेराव, विक्की चंद्रकते, तरण सूरते, राहुल बिकनेर, अजिंक्य फुके, लक्षद्वीप क्षत्रिय, किशोर कदम आदींनी परिश्रम घेतले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.